**नियमीत दिवाणी दावा क्र.९५/२०१५**
**(नंदा वि. सुभाष)**
**(CNR No.MHSN120008772015)**

## निशाणी क्र.७०, ७२, ७४ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादीचे विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश सेटअसाईड होवून मिळणेकरिता, वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला विलंब माफ होवून मिळणेबाबत आणि वारस रेकॉर्डवर घेणेकरिता अर्ज दाखल केलेला आहे.

२. वादीने त्यांच्या अर्जात असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.१ सुभाष पांडूरंग पवार हे दि.११/०३/२०२३ रोजी जयसिंगपूर येथे मयत झाले आहेत. तथापि, प्रतिवादी क्र. १ यांचे कायदेशिर व सरळ वारस रेकॉर्डवरती आणणेसाठी वादी यांना विलंब झालेला आहे. सदरचा दावा कायद्यास अभिप्रेत असलेल्या मुदतीत वारस रेकॉर्डवरती न आणलेले प्रतिवादीं क्र.१ यांचेविरुध्दचा दावा अबेटमेंटचा हुकूम झालेला आहे. सदरचा विलंब हा वादी यांनी जाणुनबुजून व हेतुपुरस्कररित्या केलेला नाही. म्हणून वादीने वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला विलंब माफ होवून अबेटमेंटचा आदेश सेटअसाईड होवून प्रतिवादी क्र. १ चे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी क्र. ७ यांनी हजर राहून सदर नि. क्र. ७०, ७२ व ७४ च्या अर्जांस म्हणणे दाखल केले असून सदर प्रतिवादी क्र. ७ यांनी सदर तिन्ही अर्जांवर हरकत घेतली असून सदरचे अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. अर्ज वाचला. अभिलेख पाहिला.

५. प्रस्तुत वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरुध्द दावा मिळकतीचे खरेदीपत्रात नमूद केले वर्णनाप्रमाणे दावा मिळकतीचे डिक्लरेशन मनाई व कब्जा करीता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.१ सुभाष पांडूरंग पवार हे दि. ११/०३/२०२३ रोजी जयसिंगपूर येथे मयत झाले आहेत. प्रतिवादी क्र. १ यांचे वारस अभिलेखावर घेतल्यास प्रतिवादी यांचे काहीएक नुकसान

होणार नाही. याउलट विलंब माफ न झाल्यास वादी यांचे पैशाने कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. मुळ दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी क्र. १ यांचे वारस अभिलेखावर घेणेस आवश्यक आहे. म्हणून वादी यांचा नि.७२ कडील अर्ज विलंब माफीचा अर्ज मंजूर करुन प्रतिवादी विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश सेटअसाईड करुन नि.७० प्रमाणे नमुद वारसांना याकामी अभिलेखात सामील करणेत येत आहे. सबब, या निष्कर्षास अनुसरुन मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**:: आदेश ::**

१. वादी यांचा नि.७०,७२ आणि ७४ कडील अर्ज मंजूर करण्यात येते.

२. वादी यांनी नि. ७०,७२ आणि ७४ कडील अर्ज दंड रक्कम रु.१५००/– प्रतिवादी यांना देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

३. दंड रक्कम भरलेनंतर वादी यांनी प्रतिवादी क्र. १ यांचे वारस अभिलेखात सामील करुन तशी दुरुस्ती दाव्यात करावी व दुरुस्त दाव्याची प्रत पुढील तारखेपर्यंत दाखल करावी.

SHAIKH MOHAMMED AAMER

Digitally signed by SHAIKH MOHAMMED AAMER
Date: 2025.07.25 17:13:40 +0530

**पलूस.** **(एम.ए.एम.जे. शेख)**

**दि.२५.०७.२०२५** **दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पलूस.**

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Sou. Jyoti A. Salunkhe (Grade-3) |
| Court | : | M.A.M.J. Shaikh, Civil Judge Junior Division & Judicial Magistrate First Class, Palus, Dist. Sangli. |
| Date | : | 25.07.2025 |
| Order signed by the Presiding officer on | : | 25.07.2025 |
| Order uploaded on | : | 25.07.2025 |